# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२५

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

## मुंबई महानगर प्रदेशामध्ये ‘केबल कार’ सेवा विकसित करण्याबाबत

**(१) १०६५ (२४-०४-२०२५) ॲड.अनिल परब :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेशातील रस्ते वाहतूक, रेल्वे तसेच मेट्रो यासारख्या सार्वजनिक वाहतूक सेवांवरील वाढता ताण लक्षात घेता ‘केबल कार’ सेवा विकसित करण्याकरीता प्रकल्प सर्वेक्षण करुन विकास आराखडा तयार करण्याचा प्रस्ताव मा.परिवहन मंत्री यांनी मा.मंत्री, रस्ते वाहतूक मंत्रालय, केंद्र शासन यांच्याकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात केंद्र शासनाकडून याबाबत कार्यवाही होण्यासाठी राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री.प्रताप सरनाईक (१७-११-२०२५) :** (१) आणि (२) मा.केंद्रीय मंत्री (रस्ते वाहतूक व महामार्ग) यांच्याकडे मुंबई विभागात रोप-वे वाहतूक सुरु करण्याबाबतची संकल्पना मा.मंत्री (परिवहन) यांच्या दिनांक ०६/०१/२०२५ रोजीच्या औपचारिक पत्रान्वये मांडण्यात आली असून सदर संकल्पनेस मान्यता मिळाल्यास मा.केंद्रीय मंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली सविस्तर प्रस्ताव तयार करण्याबाबत देखील नमूद करण्यात आले आहे.

मुंबई महानगर प्रदेशामध्ये वॉटर मेट्रो, रोप-वे, पॉड टॅक्सी याबाबतचे प्रकल्प उभारण्याच्या दृष्टीने मा.मंत्री (परिवहन) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २९/०१/२०२५ रोजी बैठक संपन्न झाली आहे. तसेच या बाबत नियम तयार करण्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभागास सूचित करण्यात आले आहे. रोप-वे बाबत सर्व्हे करून प्रकल्प अहवाल सादर करण्याबाबत एमएमआरडीए व नगरविकास विभाग यांना कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सहा. अधीक्षक, मध्यवर्ती कार्यशाळा दापोडी यांची चौकशी करुन झालेल्या नुकसानीची वसुली करणेबाबत

**(२) १४३४ (२३-०४-२०२५) ॲड.अनिल परब :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विनाशुल्क खाते वाहनाचा लाभ घेऊनही वाहतूक भत्यापोटी दरमहा रुपये २७००/- एवढ्या रकमेचे खात्याचे नुकसान करणाऱ्या सहा. अधीक्षक, मध्यवर्ती कार्यशाळा दापोडी यांची चौकशी करुन झालेल्या नुकसानीची वसुली करुन शिस्त व आवेदन कार्यपध्दतीने कारवाई करणेबाबत महाराष्ट्र एस.टी. कामगार सेनेचे सरचिटणीस यांनी दिनांक २१/०६/२०२४ रोजी मा.मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पत्राबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने दोषीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१०-११-२०२५) :** (१) होय.

(२) व (३) रा.प.महामंडळातील मध्यवर्ती कार्यशाळा दापोडी येथील दोषी सहा. अधीक्षक, सहाय्यक कर्मचारी वर्ग व कल्याण अधिकारी व लिपिक-टंकलेखक यांना आरोपपत्र देण्यात आले असून पुढील प्रमादीय कार्यवाही चालू आहे.

---

## राज्य परिवहन एस.टी.च्या तिकीट दरवाढीबाबत

**(३) १४३६ (२४-०४-२०२५) ॲड.अनिल परब :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परिवहन विभागाच्या राज्य मार्ग परिवहन प्राधिकरणाच्या झालेल्या बैठकीत अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या एसटी दरवाढीबाबत १४.९५ टक्के इतकी वाढ झाली असून एस.टी. च्या तिकिट दरवाढीला मंजूरी देण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तिकिट दरवाढीची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर दरवाढीचे स्वरुप काय आहे आणि ही दरवाढ केव्हापासून करण्यात येणार आहे ?

**श्री.प्रताप सरनाईक (११-११-२०२५) :** (१) होय.

(२) शासन निर्णय दिनांक १६/०४/१९९९ अन्वये आपोआप भाडेवाढ सुत्र निश्चित करण्यात आले आहे. यापूर्वी २६ ऑक्टोबर, २०२१ रोजी रा.प.महामंडळाने प्रवासभाड्यात वाढ केली होती. तद्नंतर डिझेल, टायरसंच, चॅसीस व कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता दर यामध्ये वाढ झाल्याने रा.प.महामंडळाच्या एकूण खर्चात देखील वाढ झाली आहे. त्यामुळे प्रवासभाड्यात वाढ केली आहे.

(३) दिनांक २५/०१/२०२५ पासून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील प्रवास भाड्यात १४.९५% वाढ करण्यात आलेली आहे.

---

## मिरा भाईंदर शहर (जि.ठाणे) येथे एस.टी.डेपो बांधण्याबाबत

**(४) १४५८ (२४-०४-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा भाईंदर (जि.ठाणे) येथील एच आर येथे आरक्षण क्र. ५७ सर्व्हे क्र. ३३८ क्षेत्र ४.९० आरक्षित असलेल्या जागेवर एसटी डेपो बांधण्याबाबत प्रवासी संघ, स्थानिक रहिवाशी, लोकप्रतिनिधींनी राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडे मागणी केली असून तेथे अद्यापपर्यंत एसटी डेपो बांधण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शहरामध्ये एसटी डेपो बांधणे आवश्यक असताना अद्यापपर्यंत मिरा भाईंदर (जि.ठाणे) एच आर येथे एसटी डेपो बांधण्यास विलंब होत असून सदर ठिकाणी एसटी डेपो तातडीने बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१२-११-२०२५) :** (१), (२) व (३) रा. प. मध्यवर्ती कार्यालयाने मिरा-भाईंदर येथील जागेत एमएक्स पॅटर्न पध्दतीचे बसस्थानक बांधण्याकरीता प्रशासकीय मान्यता दिली त्यानुसार कार्यादेश देण्यात आला होता.परंतु मिरा-भाईंदर महानगर पालिका यांच्याकडून रा. प. महामंडळाच्या जागेमध्ये मिरा-भाईंदर परिवहन व रा.प. महामंडळ असे संयुक्तिक बसस्थानक व इतर जागा विकसित करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनास देण्यात आला होता.त्यानुसार रा. प. महामंडळाकडून बसस्थानक बांधण्याकरीता स्थगिती देण्यात आली आहे.

रा. प. महामंडळाच्या पी.पी.पी. धर्तीवर जागा विकसित करण्याच्या पहिल्या टप्प्यामध्ये मिरा-भाईंदर येथील जागा बसस्थानकासह विकसित करण्याचे नियोजीत आहे.

---

## मौजे रांजणगाव (शे.पु.) ता.गंगापूर येथे नवीन पोलीस स्टेशन मंजूर करणे बाबत

**(५) २३५५ (१७-०७-२०२५) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाळुज महानगर एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या अंतर्गत रहिवाशी वसाहती व औद्योगिक अशा २ वस्तीमध्ये ४ लाख लोकसंख्या असून मागील १० वर्षापासून वाळुज परीसरात गुन्हेगारीचे प्रमाण वाढले असल्याने सदर गुन्हेगारी रोखण्यासाठी सन २०१३ व सन २०१८ मध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रशासनाने रांजणगाव शे.पु. येथे नवीन पोलीस स्टेशन स्थापन करणेसाठी शासनाचा प्रस्ताव प्रलंबित असल्याचे माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाळुज महानगर, औद्योगिक वसाहतीत गुन्हेगारी रोखण्यासाठी रांजणगाव शे.पु.येथे मनुष्यबळ व साधन सामुग्रीसह पोलीस स्टेशन मंजूर करणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०४-११-२०२५) :** (१) व (२) पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्या आस्थापनेवर पोलीस ठाणे वाळुंज व एम.आय.डी.सी. वाळुंज यांचे विभाजन करुन नवीन रांजणगाव (शे.पु.) निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाकडे दिनांक २९/०८/२०१८ रोजीच्या पत्राद्वारे सादर करण्यात आला होता. तथापि, सदर प्रस्तावामधील त्रुटींच्या अनुषंगाने, पोलीस महासंचालक कार्यालयाने दिनांक १०/१२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांना कळविण्यात आले आहे.

त्यानुसार क्षेत्रिय स्तरावर पडताळणी सुरु असून, परिपूर्ण प्रस्ताव शासनास प्राप्त नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे शहरातील हुक्का पार्लर आणि डान्स बारवर कारवाई करण्याबाबत

**(६) २५६७ (१८-०७-२०२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील बेकायदेशीर सुरु असलेल्या हुक्का पार्लर व डान्स बारवार तातडीने कारवाई करण्याचे आदेश मा.गृहराज्य मंत्री महोदयांनी मार्च, २०२५ च्या अधिवेशनात देऊनही सदर हुक्का पार्लर व डान्स बार सुरु असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०३-११-२०२५) :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

ठाणे शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत कोणताही हुक्काबार परवाना तसेच ध्वनीमुद्रीत संगीतावरील नृत्य परवाना देण्यात आलेला नाही. तथापि, बेकायदेशीरपणे हुक्काबार चालविल्याने माहे जानेवारी ते जून, २०२५ या कालावधीत एकूण ५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर गुन्ह्यांपैकी ३ गुन्ह्यात मा.न्यायालयात दोषारोपत्र दाखल करण्यात आले असून २ गुन्हाचा पोलीस तपास चालू आहे.

तसेच, आस्थापनेमध्ये अश्लिल हावभाव करून नृत्य करीत असताना मिळून आल्याने माहे जानेवारी ते जून, २०२५ या कालावधीत एकूण २ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर २ ही गुन्हाचा पोलीस तपास चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला जिल्ह्यातील धर्मदाय उप आयुक्त कार्यालयातील रिक्त पदाबाबत

**(७) ३२४७ (१७-०७-२०२५) श्री.वसंत खंडेलवाल, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील धर्मदाय उप आयुक्त कार्यालयातील सहाय्यक धर्मदाय आयुक्त ह्या एका पदासह स्टेनोग्राफर १ पद, प्रोसेस सर्वेअर २ पदे, कनिष्ठ लिपिक २ पदे, दप्तरी १ पद अशी एकूण ७ महत्त्वाची पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा रिक्त पदामुळे या कार्यालयातील कामे प्रभावित होतात, संबंधित विश्वस्तांना न्याय मिळण्यास विलंब लागतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अकोला येथील धर्मदाय उप आयुक्त कार्यालयामध्ये रिक्त पदे तातडीने भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१२-११-२०२५) :** (१) होय.
(२) होय, तथापि, सदर विलंब टाळण्यासाठी रिक्त असलेल्या सहायक धर्मादाय आयुक्त यांचेकडील प्रलंबित प्रकरणे कार्यरत सहायक धर्मादाय आयुक्त ०१ यांचेकडे हस्तांतरीत करण्यात येऊन माहे जानेवारी-२०२५ ते जून-२०२५ या कालावधीत सहायक धर्मादाय आयुक्त यांचेकडील एकूण १२४४ प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहेत.
(३) सहायक धर्मादाय आयुक्त पदाचे सुधारित सेवाप्रवेश नियम अद्ययावत करण्याची कार्यवाही चालू असून, सदर कार्यवाही पूर्ण होताच सहायक धर्मादाय आयुक्त ०१ रिक्त पद पदोन्नतीने तात्काळ भरण्यात येईल. तसेच धर्मादाय संस्थेच्या आस्थापनेवरील गट-ब (अराजपत्रित) व गट-क संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरणेबाबतची जाहिरात क्र. ०१/२०२५ दिनांक ११/०९/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली असून, सदर कार्यवाही पूर्ण होताच लघुलेखक कनिष्ठ श्रेणी ०१ रिक्त पद भरण्यात येईल. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांनी शिफारस केल्यानुसार लिपिक टंकलेखक या संवर्गातील दोन रिक्त पदे माहे-सप्टेंबर २०२५ ते माहे ऑक्टोबर २०२५ मध्ये भरण्यात आली असून सद्य:स्थितीत सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला येथे लिपिक-टंकलेखकाचे एकही पद रिक्त नाही. तसेच गट ‘ड’ संवर्गातील आदेशिकावाहक व दप्तरी ही रिक्त पदे भरण्याकरीता सक्षम नियुक्ती प्राधिकारी धर्मादाय सह आयुक्त, अमरावती असून सदर पदे भरण्याबाबत त्यांचेस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## एस.टी. महामंडळाकडून कंत्राटी तत्वावरील गाड्यामधील घोटाळयाबाबत

**(८) ३२५६ (१७-०७-२०२५) श्री.संजय केणेकर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने : तारांकित प्रश्न क्रमांक ४३३ ला दिनांक १२ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून कंत्राटी तत्वावर घेण्यात आलेल्या १३१० बसेच्या खरेदीमध्ये गैरव्यवहार झाला असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी पूर्ण झाली आहे काय, चौकशीसाठी नेमण्यात आलेल्या चौकशी समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवालानुसार दोषी आढळून आलेल्याविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१२-११-२०२५) :** (१), (२), (३) व (४) रा.प. महामंडळामध्ये १३१० बसेस भाडेतत्वावर घेण्याची निविदा प्रक्रिया दिनांक २१/०१/२०२५ रोजी रद्द करण्यात आली असून, चौकशी करण्यात येत आहे.

---

## एस.टी. महामंडळ ऑनलाईन बदली प्रक्रियेमुळे अडचणी निर्माण होत असले बाबत

**(९) ३३७० (१८-०७-२०२५) श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्याच्या राज्य मार्ग परिहवहन महामंडळात ऑनलाईन बदलांची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून सदर प्रक्रिया सुरू झाल्यापासून कर्मचारी व अधिकाऱ्यांकडून विनंती बदल्यांची संख्या पूर्वीच्या तुलनेत वाढली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ऑनलाइन बदली प्रक्रियेत सेवाजेष्ठतेनुसार प्रत्येक तीन वर्षांनी एकाच गटातील अधिकारी बदलीस पात्र असून बदली झालेल्या किती अधिकाऱ्यांनी बदली योग्य प्रकारे झाली नसल्याकारणाने प्रशासकीय न्यायाधीकरणाकडे अर्ज केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ऑनलाइन बदली प्रक्रियेमुळे एस.टी. महामंडळाच्या कामकाजावर विपरीत परिणाम होऊ नये याकरीता कर्मचारी संघटनांनी याबाबत संवाद साधला असून त्यानुषंगाने कर्मचारी संघटनांनी पुढे कोणती निर्णयात्मक शासनाने कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१०-११-२०२५) :** (१) व (२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सातारा जिल्ह्यात लोहमार्ग पोलिसठाणे निर्माण करणेबाबत

**(१०) ३४२९ (१७-०७-२०२५) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्ह्यात लोणंद ते शेणोली-१२६ किमी व लोणंद ते फलटण-२५ किमी असा एकूण १५१ किमी मध्य रेल्वेचा लोहमार्ग जातो संबंधित मार्गावर एक जिल्हास्तरीय स्थानक, ६ तालुकास्तरीय स्थानके व ९ गावस्तरीय स्थानके असून संबंधित ठिकाणाहुन दररोज २ ते २ हजार ५०० प्रवासी प्रवास करीत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित मार्ग डोंगराळ भाग व शेतशिवारातुन जात असल्याने चोऱ्या, लुटमार, मनुष्य व प्राणी अपघातांची संख्या मोठी असून यासंबधी गुन्हे नोंदवण्यासाठी जिल्ह्यात लोहमार्ग पोलीस ठाणे नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी सातारा जिल्ह्यात गुन्हे नोंदवण्यासाठी लोहमार्ग पोलीस ठाणे निर्माण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०४-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
सध्या सातारा, कराड व वाठार या ठिकाणी असलेल्या पोलीस दुरक्षेत्राच्या ठिकाणी तक्रारी नोंदविल्या जातात.
(३) सातारा जिल्ह्यात मिरज लोहमार्ग पोलीस ठाणे अंतर्गत सातारा लोहमार्ग दुरक्षेत्राचे रुपांतर पोलीस ठाण्यामध्ये करण्याबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयामार्फत दिनांक ३०/०९/२०२५ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तथापि, सदर प्रस्तावामध्ये दिनांक २५/०८/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये पोलीस ठाणे निर्मितीसाठी निश्चित करण्यात आलेल्या निकषांनुसार उपस्थित झालेल्या त्रुटींच्या अनुषंगाने पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना दिनांक ०७/१०/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील अनेक रिक्षा व टॅक्सीचालक मीटरमध्ये छेडछाड करून प्रवाशांची लुट करीत असल्याबाबत

**(११) ३४७३ (१७-०७-२०२५) श्री.राजहंस सिंह, श्रीमती उमा खापरे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगर क्षेत्रातील मीटर रिक्षा-टॅक्सीच्या दरात दिनांक १ फेब्रुवारी, २०२५ पासून तीन रुपयांची दरवाढ लागू करण्यात आली असून रिक्षा-टॅक्सीच्या मीटरचे रिकॅलिब्रेशन पूर्ण करण्यासाठी राज्य परिवहन विभागाने ९० दिवसांची मुदत (दिनांक ३० एप्रिल, २०२५ पर्यंत) दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ताडदेव, वडाळा आणि अंधेरी येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयांकडून प्राप्त माहितीनुसार आजमितीस मुंबई शहर व उपनगरातील १ लाख ३२ हजार ९३९ रिक्षांपैकी ८२,५५० रिक्षांचे आणि ३९,०९४ टॅक्सीपैकी २३,२८९ टॅक्सीचे मीटर रिकॅलिब्रेशन पूर्ण झाले असून सुमारे ४० टक्के रिक्षा-टॅक्सीचे मीटर रिकॅलिब्रेशन प्रलंबित आहे, हे हि खरे आहे काय,
(३) असल्यास, सद्य:स्थितीत मीटर रिकॅलिब्रेशन पूर्ण न झालेले रिक्षा-टॅक्सी चालक मनमानी भाडे आकारून प्रवाशांना लुबाडत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे आणि विहित मुदतीत मीटर रिकॅलिब्रेशन न करणाऱ्या मुंबई शहर व उपनगरातील रिक्षा-टॅक्सी चालकांवर शासनाने कोणती करवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१७-११-२०२५) :** (१) हे खरे आहे.

मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाने दिनांक २३/०१/२०२५ रोजीच्या बैठकीमध्ये ठराव क्रमांक ०१/२०२५ अन्वये ऑटोरिक्षा व टॅक्सी यांच्या भाडेदरवाढ मीटरचे रिकॅलिब्रेशनकरीता दिनांक ३०/०४/२०२५ पर्यंत मुदत दिली होती. तथापी, ऑटोरिक्षा व टॅक्सी यांच्या भाडेदर मीटरचे रिकॅलिब्रेशन पूर्ण न झाल्याने मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाने दिनांक ३०/०४/२०२५ रोजीच्या बैठकीमध्ये ठराव क्रमांक ०८/२०२५ अन्वये भाडेदरवाढ मीटरचे रिकॅलिब्रेशन करण्याकरीता दिनांक ३१/०५/२०२५ पर्यंत मुदत वाढ दिली आहे.

(२) मुंबई शहर व उपनगरातील १८% टॅक्सींचे व २४% ऑटोरिक्षांचे मीटर रिकॅलिब्रेशन प्रलंबित आहे. मुंबई शहरातील प्रादेशिक परिवहन कार्यालयातील टॅक्सी व ऑटो रिक्षा यांच्या मीटर रिकॅलिब्रेशनची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| कार्यालयाचे नाव | टॅक्सी वाहनांची संख्या | टॅक्सी रिकॅलिब्रेशन संख्या | ऑटो रिक्षा वाहनांची संख्या | ऑटो रिक्षा रिकॅलिब्रेशन संख्या |
|---|---|---|---|---|
| मुंबई (मध्य) | २६१४९ | २२७२३ | - | - |
| मुंबई (पश्चिम) | ३५९८ | ३१५३ | ५८४९९ | ४३२०६ |
| मुंबई (पूर्व) | ८२५५ | ५६७२ | ६९८९८ | ५४७०१ |
| बोरिवली | १५८७ | ८९९ | ६७५३१ | ५१०७६ |
| एकूण | ३९५८९ | ३२४४७ | १९५९२८ | १४८९८३ |

मुंबई शहरामध्ये व उपनगरामध्ये एकूण ३९,५८९ टॅक्सी असून त्यापैकी एकूण ३२,४४७ टॅक्सींचे रिकॅलिब्रेशन झाले आहे. तसेच मुंबई शहर व उपनगरामध्ये एकूण १,९५,९२८ ऑटोरिक्षा असून त्यापैकी एकूण १,४८,९८३ ऑटोरिक्षांचे रिकॅलिब्रेशन झाले आहे.

जे ऑटोरिक्षा व टॅक्सी विहित मुदतीत भाडेमीटर रिकॅलिब्रेशन करणार नाहीत अशा वाहनांवर विभागीय दंडात्मक कारवाई करण्यासाठी मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाने दिनांक २०/१२/२०२१ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. २२/२०२१ अन्वये निर्णय घेतला आहे.

(३) प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वायुवेग पथकामार्फत मीटर रिकॅलिब्रेशन पूर्ण न झालेले व मनमानी भाडे आकारणाऱ्या टॅक्सी /रिक्षा परवानाधारकांवर मोटार वाहन कायद्यातील तरतूदीनुसार व मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाने दिलेल्या निर्देशानुसार विभागीय कारवाई करण्यात येते.

(४) मुंबई शहर व उपनगरातील टॅक्सी व रिक्षा परवानाधारकांनी विहित मुदतीत रिकॅलिब्रेशन न केलेल्या व मनमानी भाडे आकारणाऱ्या अशा एकूण ३८३० वाहनांवर विभागिय कारवाई करुन एकूण रुपये ५२,००,७२०/- इतका दंड वसुल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

## दादर (मुंबई) येथील कापड व्यवसायिकाची कोट्यावधी रुपयाची फसवणूक केल्याबाबत

**(१२) ३५९६ (१८-०७-२०२५) श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर (मुंबई) येथील एका कापड व्यवसायिकाने विरार, बोळींज, सानपाडा, दादर, माटुंगा येथे खरेदी केलेल्या गाळे, सदनिका तसेच काही भूखंड व संयुक्त मालमत्तेवर शहा कुटुंबियांनी बनावट सह्या करून स्वतःच्या नावे सर्व मालमत्ता करून कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याबाबत माटुंगा पोलीस ठाणे, आर्थिक गुन्हे शाखा (मुंबई) तसेच मा.मुख्यमंत्री (गृह) यांच्याकडे जेष्ठ नागरिकाने माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्या सुमारास तक्रार दाखल केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर गुन्हा दाखल करून शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०४-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

दादर पुर्व येथे राहाणारे ज्येष्ठ नागरीक श्री चापसी पोपटलाल शहा (कापड व्यावसाईक) यांच्या विरार, बोळींज, सानपाडा, दादर, माटुंगा येथे गाळे व सदनिका होत्या. तसेच त्यांनी काही भुखंड खरेदी केले होते. त्या दोन भावांच्या संयुक्त मालमत्ता होत्या. त्या संयुक्त मालमत्ता बनावट स्वाक्षरीद्वारे स्वतःच्या नावे करुन फिर्यादीची कोटयावधी रुपयांची फसवणुक केल्याची तक्रार केल्याने सदर प्रकरणी दिनांक २५/१२/२०२४ रोजी माटुंगा पोलीस ठाणे, मुंबई येथे एमईसीआर क्र. ४३४/२०२४ भारतीय न्यायसंहिता २०२३ मध्ये कलम ३१६(२), ३१८(४), ३३६(२), ३३८, ३३६(३), ३४०(२), ३३९, ६१(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक ३१/०१/२०२५ रोजीच्या आदेशान्वये सदर गुन्ह्याचा पुढील तपास आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई येथे वर्ग करण्यात आला आहे. सदर गुन्हा आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई यांच्याकडे दिनांक ०१/०३/२०२५ रोजी वर्ग झाल्याने गु.र.क्र. २३/२०२५ अन्वये नोंद करण्यात आला असून सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे.

(२) सदर प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेमार्फत करण्यात आलेल्या तपासात खालील बाबी आढळून आलेल्या आहेत :-

I) फिर्यादी यांनी त्यांचे मयत भाऊ खिमजी पोपटलाल शहा Hindu Undivided Family (HUF) मध्ये त्यांचा समावेश असून त्या एचयुएफ मध्ये फिर्यादी व त्यांचा मयत भाऊ यांनी मालमत्ता खरेदी केल्या होत्या. त्या मालमत्ता आरोपींनी विक्री केल्या आहेत असा आरोप आहे. त्यानुषंगाने तपास केला असता तपासामध्ये फिर्यादी यांचा समावेश होता असे कोणतेही कागदपत्रे अद्याप मिळुन आलेली नाहीत.

II) फिर्यादी यांची डिड ऑफ डीसॉल्युशनमधील सही खाली समक्ष सही करणारे साक्षीदार यांचा भारतीय नागरीक सुरक्षा संहिता मधील कलम १८३ अन्वये जबाब नोंद करण्यात आला आहे. सदरची सही फिर्यादी यांनी स्वतः केल्याचे साक्षीदारांनी सांगितले आहे. तसेच जेष्टाराम बाग बिल्डींग हि वनिता चापसी शहा व इतरांनी स्वतःहून रजिस्ट्रार कार्यालय वरळी येथे जावून डीड ऑफ असाईनमेंट केलेले असल्याचे तपासात दिसून आले.

III) व्हाईट हाउस या भागीदारी फर्मची माहिती निबंधक भागिदारी संस्था, मुंबई यांचेकडून प्राप्त करण्यात आलेली आहे. परंतु सदर फर्ममध्ये फिर्यादी श्री चापसी शाह यांचा सामावेश दिसून येत नाही. तसेच त्यांची सदर फर्मच्या कागदपत्रांमध्ये स्वाक्षरी असल्याचे दिसून येत नाही.

IV) विरार, बोळींज, सानपाडा, दादर, माटुंगा येथील फिर्यादी व त्यांचा भाऊ खिमजी पोपटलाल शाह व त्यांची मुले यांच्या मालमत्तांबाबत तपास चालू आहे अद्यापपर्यंत सदरच्या मालमत्ता या संयुक्त / एकत्रित कुंटूबाच्या होत्या याबाबत पुरावे समोर आलेले नाहीत. त्याबाबत तपास चालू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य परिवहन (एस.टी.) महामंडळाने सादर केलेल्या कृती आराखड्यातील तांत्रिक प्रकल्पांबाबत

**(१३) ३८६८ (१८-०७-२०२५) श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाचे प्रशासकीय कारभारातील तांत्रिक प्रकल्प अद्याप प्रलंबित असून प्रवाशांची सुरक्षितता आणि प्रशासकीय कारभारात गती आणून मानवी हस्तक्षेप टाळण्यासाठी एस.टी. चे स्वयंचलन करण्याकरीता महामंडळाचे नियोजन अपुरे पडत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य परिवहन महामंडळाने १०० दिवसांच्या कृती आराखड्यानुसार विद्युत, सीएनजी आणि साध्या बसगाड्या वाढविणे, महसूल वाढ, सुविधा, प्रशासकीय कारभाराचे स्वयंचलन इ.बाबींचा समावेश करुन कृती आराखडा सादर केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य परिवहन महामंडळामार्फत अद्याप कोणत्याही सुविधा सुरु झाल्या नसल्याने एसटीचे प्रवाशी अद्यावत सोयीसुविधांपासून वंचित असून सदर प्रवाशांना तंत्रज्ञानाच्या दृष्टीने अद्यावत सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्या यादृष्टीने कृती आराखडा तातडीने कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपायोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१७-११-२०२५) :** (१) नाही.

(२), (३) व (४) रा. प महामंडळाच्या बसेस मध्ये आगाऊ आरक्षण करणाऱ्या प्रवाश्यांच्या संख्येत वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून कमी गर्दी हंगाम कालावधीकरीता लवचिक पध्दतीने भाडे आकारणी (फ्लेक्सी फेअर) अंतर्गत पूर्ण तिकीटधारी प्रवाशांना प्रवासभाड्यात १५% सवलत देण्याची योजना दिनांक ०१/०७/२०२५ पासून सुरु करण्यात आली आहे.

अत्याधुनिक सोयी-सुविधा अंतर्गत रा.प. प्रवाशांना मार्गावरील बसचे प्रत्यक्ष ठिकाण उपलब्ध करुन देणेकरीता १६१२४ बसेसमध्ये VTS यंत्रणा बसविण्यात आली असून, प्रवाशांना बसेसची माहिती उपलब्ध होणेकरीता राज्यातील ३२१ बसस्थानकावर ६०० प्रवासी माहिती संच (PIS Screen) बसवण्यात आले आहेत.

तसेच मार्गावरील प्रवाशांना रा.प. बसचे ठिकाण उपलब्ध होणेकरीता कम्प्युटर ॲप google play store व ios apple store वर उपलब्ध करण्यात आले असून याद्वारे अद्ययावत सुविधा देण्याकरीता कार्यवाही सुरु आहे.

रा.प. महामंडळांच्या बसस्थानकांवर प्रवाशी जनतेस पायाभूत सोई सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे व त्या माध्यमातुन महामंडळास प्रवासोत्तर महसूल प्राप्त करुन घेण्यासाठी वाणिज्य आस्थापना (उदा. उपहारगृह, स्नॅकबार, महा ई-सेवाकेंद्र, विविध वस्तु भांडार, जन औषधी/मेडीकल, दुचाकी वाहनतळ इत्यांदी) कार्यान्वित केलेल्या आहेत.

---

## राज्यातील सर्व एस.टी. बसस्थानक व आगारांची सुरक्षा ऑडिट करणेबाबत

**(१४) ३९४० (१८-०७-२०२५) डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे स्वारगेट येथील बस स्थानकामध्ये एका तरुणीवर अत्याचार झाल्यामुळे मा.परिवहन मंत्री महोदयांनी राज्यातील सर्वच बस स्थानक आणि आगारांची सुरक्षा ऑडिट करण्याचे आदेश दिले असून राज्यातील प्रत्येक आगाराचे सुरक्षा ऑडिट करुन सध्या एस.टी. महामंडळाच्या विविध आगारात व बस स्थानकांवर किती सुरक्षा कर्मचारी कार्यरत आहेत तसेच किती सुरक्षा रक्षकांची आवश्यकता आहे, सीसीटीव्ही स्थिती काय आहे व सुरक्षिततेबाबत कसूर करणाऱ्या आगार प्रमुखाची विभागनिहाय चौकशी करुन दोषींवर तात्काळ निलंबित करण्याची कारवाई याबाबत अहवाल सादर करण्याचे आदेश देऊनही अद्याप कोणताही अहवाल शासनाकडे सादर केला नसल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या आगार व बसस्थानकामध्ये सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१२-११-२०२५) :** (१), (२) व (३) रा.प. स्वारगेट बसस्थानकावर घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने महिला सुरक्षेबाबत रा.प. महामंडळातील सर्व बसस्थानकाचे वरिष्ठ सुरक्षा व दक्षता अधिकारी /सुरक्षा व दक्षता अधिकारी यांचेमार्फत सुरक्षा अंकेक्षण (ऑडीट) करुन घेण्यात आलेले होते. त्यामध्ये विभागात आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने उपाययोजना केल्या आहेत. विभागातील जिल्हास्तरीय ४८ बसस्थानकांवर एकूण ५४० सुरक्षा रक्षक नेमण्यात आलेले आहेत. तसेच सदर बसस्थानकांवर प्रत्येकी ०२ महिला सुरक्षा रक्षक नेमण्यात आलेले आहेत. सुरक्षा व दक्षता शाखेमार्फत सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात आलेली असून, नियमित सुरक्षा व्यवस्था तपासली जाते. तसेच सी.सी.टी.व्ही. जोडण्यात आलेले आहे.

संबंधित आगार व्यवस्थापक रा. प. स्वारगेट यांचे तात्काळ निलंबन करण्यात आले होते. परंतु संबंधित आगार व्यवस्थापक यांना तात्काळ पुनःस्थापीत न करता, सदर प्रकरणाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर आगार व्यवस्थापक यांना आरोपपत्र देण्यात आले. त्यानंतर आरोपपत्राबाबत समक्ष सुनावणी

पूर्ण झाल्यानंतर महामंडळाचा उन्हाळी गर्दीचा हंगाम माहे मे, २०२५ दरम्यान सुरु झाल्याने उन्हाळी गर्दीच्या हंगामातील आवश्यकता विचारात घेऊन निलंबन उठविण्यात आले असून अधिकाऱ्यांची बदली करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत संबंधित अधिकाऱ्यांवर विभागीय चौकशी सुरु आहे.

---

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसस्थानक आगाराचे सुरक्षा लेखापरीक्षण

**(१५) ४०८७ (१८-०७-२०२५) श्री.अमित गोरखे, श्री.सुनिल शिंदे, श्री.संजय केणेकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसस्थानक आगाराचे तातडीने सुरक्षा लेखापरीक्षण करावे आणि तेथील नादुरुस्त व जप्त केलेल्या भंगार बस गाड्या निष्कषित करण्यात याव्यात सूचना असे आदेश मा.परिवहन मंत्री महोदयांनी प्रशासनाला दिल्या असल्याची बाब दिनांक १६ एप्रिल, २०२५ रोजी वा त्या सुमारास एसटी प्रशासनाला दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशान्वये आजमितीस राज्यातील किती एसटी बस स्थानक आणि आगारांचे सुरक्षा लेखापरिक्षण करण्यात आले आहे आणि एसटी बस स्थानक आणि आगारांचे सुरक्षा लेखापरिक्षण प्रलंबित आहे; हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आदेशाच्या अंमलबजावणीबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१२-११-२०२५) :** (१) होय.

(२), (३) व (४) रा.प.स्वारगेट बसस्थानकावर घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने महिला सुरक्षेबाबत रा.प.महामंडळातील सर्व बसस्थानकाचे वरिष्ठ सुरक्षा व दक्षता अधिकारी/सुरक्षा व दक्षता अधिकारी यांचेमार्फत सुरक्षा अंकेक्षण (ऑडीट) करुन घेण्यात आलेले होते. त्यामध्ये विभागात आढळलेल्या त्रुटींबाबत संबंधित विभागाच्या विभाग नियंत्रक यांना त्रुटींची पूर्तता करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

सुरक्षा अंकेक्षणाच्या अहवालामध्ये आढळून आलेल्या बाबींच्या अनुषंगाने संबंधित खातेप्रमुखांना तात्काळ कारवाई सुरु करणेस्तव कळवून उपाययोजना केल्या आहेत.

विभागातील जिल्हास्तरीय ४८ बसस्थानकांवर एकूण ५४० सुरक्षा रक्षक नेमण्यात आलेले आहेत. तसेच सदर बसस्थानकांवर प्रत्येकी ०२ महिला सुरक्षा रक्षक नेमण्यात आलेले आहेत.

सुरक्षा व दक्षता शाखेमार्फत सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात आलेली असून, नियमित सुरक्षा व्यवस्था तपासली जाते. तसेच सी.सी.टी.व्ही. जोडण्यात आलेले असून, महिला सुरक्षा रक्षकांची नेमणूक केलेली आहे.

---

## पिंपरी चिंचवड येथील जुन्या गाड्यांची नंबर प्लेट बदलून घेण्यासाठी सेंटर चालक पैसे घेत असल्याबाबत

**(१६) ४१०७ (१७-०७-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत : तारांकित प्रश्न क्रमांक १८३७ ला दिनांक १९ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड (जि.पुणे) येथील जुन्या गाड्यांची नंबर प्लेट बदलून घेण्यासाठी ऑनलाइन पैसे भरलेले असतानांही फिटमेंट सेंटरवर गाडीची जुनी नंबर प्लेट काढण्यासाठी ३० रुपये घेत असल्याचे चिंचवडच्या पूर्ण नगर येथील गॅलेक्सी मोटर्स या फिटमेंट सेंटरवर असे प्रकार होत असल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देशात दिनांक १ एप्रिल २०१९ पासून नवीन वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट देणे बंधनकारक केले असून उच्च सुरक्षा वाहन पाटी (एच एस आर पी) बसविण्यासाठी शासनाने दर निश्चित केले परंतु प्रत्यक्षात अर्ज भरणे व नंबर प्लेट बसवणे यात वाहन चालकांची खुलेआम लूट होत असल्याने राज्यात एकच दर ठेवण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१७-११-२०२५) :** (१) याबाबत स्थानिक दैनिक वृत्तपत्रामध्ये बातमी प्रसिध्द झाली होती. तथापि, चौकशीअंती यामध्ये तथ्य आढळून आलेले नाही.

(२) जुन्या वाहनांवर एचएसआरपी बसविण्याकरीता शासनाने दर निश्चित केले आहेत. अर्ज भरण्याची, एचएसआरपी अपॉईंटमेंट घेण्याची व शुल्क भरण्याची सर्व प्रक्रिया ही वाहन मालकांना ऑनलाईन स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई गोरेगाव येथील पशुवैद्यकीय रुग्णालयात शस्त्रक्रिया दरम्यान अचानक स्लॅब कोसळल्याबाबत

**(१७) ४१३४ (१८-०७-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव (मुंबई) येथील पशुवैद्यकीय रुग्णालयात शस्त्रक्रियेदरम्यान अचानक स्लॅब कोसळण्याची बाब माहे मे २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत काही वर्षापासून या रुग्णालयाच्या इमारती जीर्ण अवस्थेत असल्याने अनेकदा स्लॅब कोसळण्याचे प्रकार घडत असतानाही या इमारतीचे पुनर्बांधणी न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-११-२०२५) :** (१) मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या गोरेगाव येथील पशु रुग्णालयाच्या इमारतीमध्ये दिनांक १५/०५/२०२५ रोजी सदर रुग्णालयाच्या शस्त्रक्रियागृहातील छताचा छोटा तुकडा पडला होता.त्यावेळी शस्त्रक्रिया किंवा उपचार चालू नव्हते.
(२), (३) व (४) सदर रुग्णालयाच्या इमारतीचे वीर जिजामाता तंत्रज्ञान संस्था (VJTI) मुंबई यांचेमार्फत संरचनात्मक परीक्षण फेब्रुवारी २०२५ मध्ये करण्यात आले असून प्राप्त अहवालानुसार सदर इमारतीची संरचनात्मक दुरुस्ती करण्यात येत आहे. सदर परिसरात अत्याधुनिक पशुवैद्यकीय सेवासुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने "मल्टीस्पेशालीटी हॉस्पीटल" उभारण्यास दिनांक १०/१०/२०२५ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

---

## महाराष्ट्रात शिक्षकांवर होणाऱ्या हल्ल्यांबाबत

**(१८) ४१४२ (१८-०७-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये शिक्षकांवर हल्ले होत असून शिक्षकांवर होणारे हल्ल्यामुळे शिक्षण संस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य शासनाकडून शिक्षकांच्या सुरक्षिततेसाठी स्वतंत्र मार्गदर्शकतत्त्वे किंवा नियमावली तयार करण्यात आली असून भविष्यात अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी शाळा व महाविद्यालयातील शिक्षकांच्या संरक्षणासाठी कोणती विशेष उपाययोजना केली तसेच अशा प्रकारच्या घटनांमधील आरोपींवर कारवाई करण्याबाबत पोलीस प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०२५) :** (१) होय.
(२) शिक्षकांवरील होणाऱ्या हल्ल्यासंदर्भात घटकातील शाळा व महाविद्यालयीन शिक्षकांशी समन्वय साधून त्यांना काही अडचणी निर्माण झाल्यास किंवा त्यांची काही तक्रार प्राप्त झाल्यास वेळीच योग्य कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच गुन्ह्यातील आरोपीविरुध्द वेळीच गुन्हे नोंदवून कायदेशीर कार्यवाही करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्रातील एसटी डेपो व एसटी मध्ये डिजिटल पेमेंटची गैरसोय होत असल्याबाबत

**(१९) ४१४३ (१८-०७-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील बऱ्याच ठिकाणी एसटी प्रवाशांना तिकिटासाठी अद्यापही केवळ रोकड व्यवहारावर अवलंबून राहावे लागत असून महाराष्ट्र राज्य मार्गपरिवहन महामंडळाकडे (MSRTC) डिजिटल पेमेंट सिस्टीम लागू करण्यात आली नसल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे का,
(२) असल्यास, अनेक प्रवासी UPI, कार्ड किंवा मोबाईल ॲप्सद्वारे तिकीट भरण्यास इच्छुक असताना सुविधा उपलब्ध नसल्यामुळे त्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देण्यासाठी एस.टी. महामंडळाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१०-११-२०२५) :** (१) व (२) नाही.
(३) व (४) डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देण्यासाठी एसटी महामंडळाने ऑनलाईन संगणकीय तिकीट कार्यप्रणाली (पीओआरएस) व मोबाईल ॲप्लीकेशन द्वारे ऑनलाईन तिकीट काढण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. तरी, वाहकामार्फत देण्यात येणाऱ्या ईटीआय मशिन मधुन क्यु आर कोड/युपीआय द्वारे तिकीट देण्याची सुविधा प्रवाशांना माहे नोव्हेंबर २०२३ पासून उपलब्ध करण्यात आलेली आहे.

---

## राज्य परिवहन महामंडळाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वारसांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(२०) ८४२३ (१५-०६-२०२१) श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य परिवहन महामंडळाने कोरोनामुळे मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर कोणतीही अट न घालता नोकरी देण्याचा निर्णय घेतला परंतू संबंधित कर्मचाऱ्यांचा मृत्यू होण्यापूर्वी ती व्यक्ती १४ दिवस अगोदर कर्तव्यावर असेल तरच त्याच्या वारसांना ५० लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात येणार असल्याच्या वादग्रस्त अटीमुळे आतापर्यंत फक्त ११ जणांना ५० लाख रुपयांची आर्थिक मदत मिळाल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच, कामावर असताना कोरोनाची लागण होऊन मृत्यू झाल्यास चालक, वाहक, सुरक्षा रक्षक व वाहतूक निरीक्षक आदींच्या वारसांना राज्य शासनाच्या नियमानुसार ५० लाख रूपये आर्थिक मदत जाहीर करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य परिवहन महामंडळातील माहे एप्रिल, २०२० ते आजमितीपर्यंत ७९७० कर्मचारी कोरोनाबाधित झाले असून २२८ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला, गतवर्षी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सदरहू मृत्य पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावरील नोकरीसाठी मागील ८ महिन्यांपासून पाठपुरावा करुनही अद्यापपर्यंत एकाही कर्मचाऱ्यांच्या वारसाला नोकरीत सामावून घेण्यात आलेले नाही, तसेच, एसटी मुख्यालयाकडे अनुकंपा नोकरीची १०० पेक्षा जास्त प्रकरणे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, परजिल्ह्यातून मुंबईत बेस्ट उपक्रमाच्या मार्गावर सेवा देणाऱ्या एसटी कर्मचाऱ्यांना प्रतिदिन ५००/- रुपये भोजन आणि विशेष शहर पुरक भत्ता देण्यात यावा, अशी कर्मचाऱ्यांची मागणी आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद् नुसार राज्य परिवहन महामंडळाने घातलेली वादग्रस्त अट रद्द करुन कोरोना काळात मृत पावलेल्या सर्व राज्य परिवहन महामंडळाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वारसांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना विनाविलंब अनुकंपा तत्वावर नोकरीत समावून घेवून जाहीर केलेली ५० लाख रूपयांची आर्थिक मदत देण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१९-११-२०२५) :** (१), (२), (३), (४) व (५) महाराष्ट्र शासनाने दिनांक २९/०५/२०२० रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने रा.प. महामंडळाने दिनांक ०१/०६/२०२० अन्वये कोविड-१९ विषाणूमुळे मृत्यू पावलेल्या १० अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या शर्ती व अटी पूर्ण केलेल्या वारसास रुपये ५० लाख सानुग्रह अनुदान अदा करण्यात आलेला आहे.

तथापि, ज्या मृत अधिकारी/ कर्मचाऱ्यांना सदर योजनेंतर्गत लाभ मिळू शकत नाही. अशा १७७ अधिकारी/ कर्मचाऱ्यांना दिनांक ३०/०९/२०२१ अन्वये रुपये ०५ लाख रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

कोविड-१९ महामारीत मृत्यू पावलेल्या ३१२ अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या वारसांपैकी अनुकंपा तत्वावर नोकरी मिळण्याकरीता २७० वारसांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी १७१ वारसांना अनुकंपा तत्वावर नेमणूका देण्यात आल्या असून,१० उमेदवार रिक्त जागे अभावी प्रतिक्षा यादीवर आहेत. ४९ वारसांनी शिक्षणाकरीता हक्क राखून ठेवला आहे. ३२ वारसांचे कागदपत्रे अपूर्ण असल्यामुळे कार्यवाही सुरु आहे ०८ उमेदवार नोकरीकरीता अपात्र ठरले आहेत. तसेच, ३४ वारसांनी अनुकंपा नोकरी ऐवजी रुपये १० लाख इतके आर्थिक सहाय्य मिळणेबाबत अर्ज सादर केलेले होते. त्यापैकी, २४ वारसांना रुपये १० लाख इतके आर्थिक सहाय्य देण्यात आलेले असून, ०१ वारसाला निधि अभावी आर्थिक सहाय्य देणे प्रलंबित आहे ५ वारसांनी आर्थिक सहाय्याकरीता आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली नाही. तसेच ०४ उमेदवार आर्थिक सहाय्य मिळणेकरीता अपात्र ठरले आहेत.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.